# अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना प्री -मॅट्रिक शिष्यवृत्ती सन २०१२-१३

## फॅार्म भरताना लक्षात घ्यावयाच्या सूचना

१.) अल्पसंख्यांक समाजातील विद्यार्थ्यांसाठी मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना सन २०१२-१३ साठी ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाचे आहेत.

२.) सदरचे अर्ज मुख्याध्यापकांनी www.escholarship.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरुन भरुन त्याची एक प्रिंट घ्यावी सदरची प्रिंट तपासून प्रमाणित करुन गटशिक्षणाधिकारी यांचेकडे जमा करावी.

३.) गट शिक्षणाधिाकारी यांनी सदरचे प्राप्त अर्ज शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) / शिक्षण निरीक्षक (बृहन्मुंबई ) यांचेकडे जमा करावेत.

४.) शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ) / शिक्षण निरीक्षक (बृहन्मुंबई ) यांनी ऑनलाईन भरलेली माहिती व प्रमाणित करुन सादर केलेली प्रत याची तपासणी करुन शिक्षण उपसंचालक यांचेकडे माहिती सादर करावी.

५.) विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी सदर माहिती तपासून शिक्षण संचालक यांना फक्त ऑनलाईन सादर करावी. प्रमाणित केलेल्या सर्व प्रती जिल्हयांना पाठवून जिल्हा स्तरावर सर्व अर्जाच्या प्रती जतन करुन ठेवाव्यात.

६.) विद्यार्थ्यांने संपूर्ण अर्ज पूर्णपणे भरलेला आहे किंवा नाही हे पहाण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकाची राहील. जिल्हा परिषद / नगर पालिका शाळेतील विद्यार्थ्यांचा अर्ज परिपूर्ण भरुन घेण्याची जबाबदारी शिक्षण / केंद्र प्रमुख याची राहील.

७.) विद्यार्थ्याचे अर्जात भरलेली माहिती बरोबर असल्याची खात्री मुख्याध्यापक / केंद्र प्रमुख यांनी करावी आणि अर्जात नमूद केलेल्या दोनही ठिकाणी स्वाक्षरी करावी. अर्जातील माहिती चुकीची आढळल्यस संबंधित मुख्याध्यापक जबाबदार राहतील आणि अर्ज नाकारला जाईल. तसेच याबाबत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही.

८.) सन २००९-१० च्या शासन परिपत्रक दिनांक १३/०८/२००९ नुसार सदर योजना शिक्षण संचालनालय (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण) यांचेकडे वर्ग करण्यात आलेली आहे. तथापि अद्याप सदर योजना शिक्षण संचालनालय ( माध्यमिक व उच्च माध्यमिक ) यांचेकडेच असल्याने जिल्हास्तरावर सदर योजना राबविण्याची संपूर्ण जबाबदारी शिक्षणाधिकारी ( माध्यमिक )/ शिक्षण निरीक्षक यांची राहील. शिक्षणाधिकारी ( प्राथमिक ) यांचेशी समन्वयाने काम पूर्ण करावयाचे आहे. याबाबतीत विभागीय शिक्षण उपसंचालक यांनी संपूर्ण सनियंत्रण करावे.

९.) सदर योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांनी आपल्या कार्यालयातील एका जाबाबदार उपशिक्षणाधिकाऱ्याची नियुक्त करावी आणि त्यांची नावे तात्काळ कळविण्यात यावीत.

१०.) या योजनेचा सन २०१२-१३ चा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करावयाची अंतिम मुदत १५ सष्टेंबर २०१२ आहे. त्यामुळे संचालनालय स्तरावरुन वेळोवेळी देण्यात येण्याऱ्या सूचनाची अमंलबजावनी वेळेत होईल, याकडे विभागीय शिक्षण उपसंचालक आणि शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांनी लक्ष दयावे. एका शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे अर्ज शक्यतो एकदाच एकत्रित करावेत.

११.) विभागीय शिक्षणउपसंचालकांनी सदर योजनेचा आढावा प्रत्येक आठवडयात घ्यावा. तसेच सदर योजनेच्या कामाकाजाच्या दुष्टीने शिक्षणाधिकारी (माध्यमिक ) यांना आपल्या स्तरावरुन योग्य

त्या सुचना द्याव्यात. त्यांच्या समन्वयाबद्दल कोणत्याही प्रकाराची तक्रार संचालनालयाकडे येणार नाही. याची दक्षता विभागीय शिक्षण उपसंचालकांनी घ्यावी.

१२.) या योजनेची अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत केंद्र शासनाने ३१ ऑगस्ट २०१२ ही दिली असली तरी महाराष्ट्रात येणाऱ्या अर्जाची संख्या विचारात घेता आणि केंद्र शासनास प्रस्ताव वेळेत सादर करण्याची अट लक्षात घेता विद्यार्थ्याकडून अर्ज लवकरात लवकर प्राप्त करुन घेऊन आलेले अर्ज वर दिलेल्या सूचनानूसार एकत्र करुन सादर करावेत. ३१ ऑगष्ट नंतर विद्यार्थ्यांना अर्ज भरता येणार नाहीत यांची कल्पना घ्यावी.

१३.) नूतनीकरणाची माहितीही ऑनलाईनपध्दतीने भरावयाची असल्याने ती विहित वेळेत ऑनलाईन पध्दतीने भरावी.

१४.) अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांना मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती ही योजना इयत्ता १ ली ते १० वी च्या शासनमान्य शासकीय अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित शाळेतील विद्यार्थ्यांना लागू राहील.

१५.) केंद्रशासनाने जाहीर केल्याप्रमाणे अल्पसंख्यांक समाजामध्ये मुस्लिम, ख्रिश्चन, बौध्द, शीख व पारशी या धर्माचा समावेश होतो.

१६.) विहीत नमुन्यातील ऑनलाईन प्रिंट मुख्याध्यापक / विद्यार्थ्यांनी भरुन द्यावा.

१७.) विद्यार्थ्यांचे गेल्यावर्षाचे गुण, विद्यार्थी अल्पसंख्यांक असल्याबाबत आणि इतर माहिती बरोबर असल्याचे मुख्याध्यापकाने प्रमाणित करावे व अर्जाच्या पहिल्या व मागच्या पानावर स्वत:ची सही शिक्का करुन शिक्षणाधिकारी यांचेकडे अर्ज जमा करावेत.

१८.) शिष्यवृत्तीचा लाभ मिळण्यासाठी मागील वर्षाच्या परीक्षेमध्ये ५० टक्के पेक्षा जास्त गुण आवश्यक आहेत. तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांचे एकत्रित उत्पन्न रुपये एक लाखापेक्षा जास्त नसावे.

१९.) परिरक्षण भत्ता वसतीगृहातील तसेच वसतीगृहाबाहेरील दिलेल्या दराप्रमाणे अनुज्ञेय आहे.

२०.) एका कुटुंबातील दोन पेक्षा जास्त पाल्यांना शिष्यवृत्ती अनुज्ञेय नाही.

२१.) विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती आवश्यक आहे.

२२.) ही शिष्यवृत्ती घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे अपवादात्मक परिस्थितीशिवाय एका शाळेतून दुसऱ्या शाळेत स्थलांतर करता येणार नाही.

२३.) एखाद्या विद्यार्थ्यास चुकीच्या माहितीच्या आधारे शिष्यवृत्ती दिली गेल्याचे निदर्शनास आल्यास त्या विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती तात्काळ रद्द करण्यात येईल व त्यास प्रदान करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या रक्कमेची वसुली करण्यात येईल.

२५.) ज्या विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात आला आहे अशा विद्यार्थ्यांना इतर योजनांतून मिळणाऱ्या शिष्यवृत्ती व सवलतीचा लाभ घेता येणार नाही.

२६.) ऑनलाईनवर अपुर्ण भरलेले, फोटो व विद्यार्थ्यांची / मुख्याध्यापकाची सही नसलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

२७.) शिष्यवृत्ती मंजूर झाल्या नंतर विद्यार्थ्यांची पुढील कागद पत्रे मुख्याध्यापकाने जमा करावी.

अ) बँकेत खाते उघडुन बँकेच्या खाते पुस्तकाच्या पहिल्या पानाची झेरॉक्स.

ब) स्वयंरोजगार असलेल्या पालकांची रु. १०/- च्या नॉन ज्युडिशिअल स्टँम्पवर स्व:साक्षाकींत उत्पनाचा दाखला दयावा आणि नोकरी करणाऱ्या पालकांनी उत्पन्नाचे प्रमाणपत्र दयावे.

क) शिष्यवृत्ती मंजूर झाल्यानंतर अल्पसंख्यांक असल्याबाबतचे प्रमाणपत्र रु.१०/- च्या नॉन ज्युडिशिअल स्टॅम्प पेपरवर देणे आवश्यक राहील.